भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

सत्यमेव जयते

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2023 ◐ CE 033430

अनु.क्र. 49587 दि 01 DEC 2023

मु.शु.रक्कम 5001/-

दस्ताचा प्रकार भागीदारीपत्र

दस्त नोंदणी करणार आहेत का ? होय/नाही.

मिळकतीचे वर्णन

मुद्रांक विकत घेणाऱ्याचे नांव व पत्ता बेला कासा लाईफ स्पेसेस

दुसऱ्या पक्षकाराचे नांव नॉव सीटी पुणे 41

हस्ते व्यक्तीचे नांव व पत्ता श्रीनिवास रवीमणी

श्री. बाळासाहेब मारुती गायकवाड
परवाना क्र. २००११५६
ता वडगांव खुर्द. सिंहगड रोड पुणे-४१ मुद्रांक विकत घेणाऱ्याची सही

या कारणासाठी ज्यांनी मुद्रांक खरेदी केला, त्यांनी त्याच कारणासाठी मुद्रांक खरेदी केल्यापासून ६ महिन्यात वापरणे बंधनकारक आहे.

वरिष्ठ कोषागार अधिकारी पुणे
29 NOV 2023
प्रथम मुद्रांक लिपीक कोषागार पुणे करिता

भागीदारी पत्र – बेला कासा लाईफस्पेसेस

भागीदारी पत्र तारीख *१ डिसेंबर २०२३* चे दिवशी पुणे येथे...

Nadhav KYKarlwar

१. श्री नवनाथ दत्तात्रय जाधव, भारतीय नागरिक
वय : ४४ वर्षे, धंदा : व्यवसाय
पॅन - AFTPJ4421L
मुक्ताई बिल्डींग, सर्वे नं ५२/१/१,
शनी मंदिर रोड, नेताजी नगर,
पिंपळे गुरव, पुणे - ४११०६१
(पुढे भागीदार क्र. १ (कार्यरत भागीदार) म्हणून संबोधले आहे)

२. करेवार वेंचर्स प्रायव्हेट लिमिटेड,
CIN NO: U43299PN2023PTC226041
पॅन – AAKCK6708J
ऑफिस नं -०४, जानकी कॉर्नर
१००७१००९ सदाशिव पेठ ,
पुणे - ४११०३०
(पुढे भागीदार क्र. २ (कार्यरत भागीदार) म्हणून संबोधले आहे)

कारणे भागीदार पत्र लिहून ठेवतो की ज्या शर्तींवर भागीदारीचा व्यवसाय करावयाचा आहे त्या शर्ती भागीदार पत्रात लिहून ठेवाव्यात असे आपले ठरले, त्या शर्ती येणेप्रमाणे---

१. भागीदारीचे नांव व स्वरूप:-

अ) **भागीदारीचे नाव**:- भागीदारीचा व्यवसाय **"बेला कासा लाईफस्पेसेस"** या नावाने करावयाचा आहे. मात्र आपल्या सर्वांच्यामते दुसऱ्या नावानेही भागीदारीत व्यवसाय करता येईल.

ब) **भागीदारीचा व्यवसाय**:- भागीदारीचा व्यवसाय हा बांधकाम , रिअल इस्टेट , कंत्राटदार आणि भाडेतत्वाच्या सेवा हा असून याशिवाय भागीदारांच्या इच्छेने इतर कोणताही व्यवसाय भागीदारीत करता येईल.

२. भागीदारीच्या व्यवसायाचे मुख्य ठिकाण:
भागीदाराचा व्यवसाय हा फ्लॅट नं. डी १४०५, शुभकल्याण, नांदेड सिटी, सिंहगड रोड, पुणे - ४११०४१ येथे करावयाचा आहे. मात्र आपल्या सर्वांच्या मते इतर ठिकाणीही भागीदारीत व्यवसाय करता येईल.

३. भागीदारीची सुरुवात:- भागीदारीची सुरुवात १ डिसेंबर २०२३ पासून सुरु होईल.

४. भागीदारीचे भांडवल:-
भागीदारीचे भांडवल रु. ५०,०००/- (पन्नास हजार) राहील. सदरचे भांडवल वेळोवेळी सर्व भागीदारांच्या मताने भागीदार भागीदारीत आणतील. भागीदारीस आवश्यकता भासल्यास भागीदारांच्या सर्वानुमते त्रयस्तांकडून रक्कम उभी केली जाईल. सदर रकमेवरील व्याज व्यवसायाचा खर्च संबोधण्यात येईल.

Nrjadhav KYKarewar

५. भागीदारांना वेतन:-

अ) सर्व भागीदारांनी आपला वेळ व लक्ष भागीदारी व्यवसायाकडे देण्याचे ठरवले आहे. त्या मोबदल्यात त्यांना पुस्तकी नफ्याच्या प्रमाणात पुढीलप्रमाणे वेतन घ्यावयाचे ठरले आहे.

पहिला पुस्तकी नफा रु.३,००,०००/- - पुस्तकी नफ्याच्या ९०%
(रु. १,५०,०००/- किंवा ९०% यापेकी जास्तीची रक्कम)
पुढील पुस्तकी नफ्यावर - पुस्तकी नफ्याच्या ६०%

ब) वरील प्रमाणे वेतन ठरविण्यासाठी नफा म्हणजे आयकर कायदा १९६१ च्या कलम ४० (बी)(प्रकरण ४ड) प्रमाणे ठरविलेला नफा व त्यामध्ये वेळोवेळी बदलाप्रमाणे ठरविलेला नफा होय. तोटा असल्यास वेतन देता येणार नाही.

क) सर्वानुमते असे ठरवण्यात आले की भागीदारीचे वेतन वर्षाअखेर सर्वप्रकारचे खर्च वजा करता वर्षाअखेर ठरवण्यात येईल.

ड) आयकर कायदा १९६१ च्या कलम ४० (ब) च्या वेळोवेळी बदलानुसार वेतन व नफा विभागणीबाबत भागीदारी पत्रात भागीदारांच्या सर्वानुमते दुरुस्ती करण्यात येईल.

६. भागीदारांच्या भांडवली खात्यात अथवा चालू किंवा कर्ज खात्यात जी रक्कम जमा असेल त्यावर आयकर कायद्याच्या कलम ४० (ब) (४) प्रमाणे अथवा त्या हिशोबी वर्षासाठी अस्तित्वात लागू असलेल्या निर्धारणाच्या पध्दती प्रमाणे द.सा.द.शे. १२% प्रमाणे किंवा कमी जास्त सरळ व्याज देण्यात यावे. भागीदारी धंद्याच्या निव्वळ नफा अगर नुकसान हे वरील व्याज हिशोबात घेतल्यानंतर काढले जाईल.

७. नफा-तोटा विभागणी:-

भागीदारीचा निव्वळ नफा हा व्यवसायाच्या जमा खर्चाच्या हिशोबानुसार परंतु व्यवसायाचे सर्वसंबंधित खर्च वजा केल्यानंतर खालीलप्रमाणात विभागले जातील.

क्र.	भागीदारांचे नावे	विभागणी
१.	श्री नवनाथ दत्तात्रय जाधव	५० %
२.	करेवार वेंचर्स प्रायव्हेट लिमिटेड	५० %

भागीदारीस निव्वळ तोटा झाल्यास तोसुद्धा वरीलप्रमाणे विभागण्यात येईल.

८. भागीदारी व्यवसायाचे हिशोबाचे वर्ष हे आर्थिक वर्ष म्हणजे १ एप्रिल ते ३१ मार्च असे राहील.

९. कोणत्याही बँकेत अथवा बँकात भागीदारी फर्मचे खाते उघडले जाईल. तसेच सर्वानुमते वेळोवेळी असे खाते **भागीदार क्र. १ आणि भागीदार क्र.२ , या दोघांच्या सहीने करता येईल** किंवा त्यासंबंधी वेळोवेळी निर्णय दोघांच्या संमतीने घेण्यात येईल.

Nadhao KYKarewar

१०. भागीदाराच्या मृत्यू , दिवाळखोरी किंवा तत्सम वेळी उर्वरित भागीदार " **बेला कासा लाईफस्पेसेस** " या नावाने व्यवसाय चालू ठेवू शकतील .भागीदाराच्या मृत्यूनंतर त्या मृत व्यक्तीचा नॉमिनी किंवा जर नॉमिनी नसेल तर त्या मृत व्यक्तीचा कायदेशीर वारसदार भागीदारीत भागीदार म्हणून काम पहिल . तसेच मृत भागीदाराचा नॉमिनी / कायदेशीर वारसदार भागीदारीमद्ये भागीदार होयचे की नाही हे स्वतः ठरवतील . प्रत्येक भागीदारास नॉमिनेशन फॉर्म भरणे बंधनकारक राहील .

११. भागीदारीचे स्वरूप:-भागीदारीची कालमर्यादा ऐच्छिक स्वरुपाची म्हणजे पार्टनरशीप ॲटवील' अशी राहील.

१२. कोणाही भागीदारास इतर भागीदाराच्या लेखी संमतीशिवाय खालील गोष्टी करता येणार नाही. जर एखाद्या भागीदाराने संमतीशिवाय एखादी गोष्ट केली तर तो भागीदार त्यास पूर्णपणे जबाबदार राहील.

अ) भागीदारी संस्थेचा पैसा, माल अगर चीज वस्तू भागीदारी धंद्याशिवाय तारण, जमीन अथवा वचन देऊन भागीदारी मधून पैसे देणे, तथापि भागीदारी धंद्याच्या फायद्याकरिता केलेल्या कृत्याचा आणि भागीदारी धंद्याच्या सर्वसाधारण व्यवहाराचा यात समावेश नाही.

ब) भागीदारीतील त्याचा असलेला हिस्सा अगर त्याचा भाग भागीदाराच्या संमतीशिवाय तबदील करणे, गहाण टाकणे अगर त्याचा बोजा निर्माण करणे अथवा अन्य कोणास त्यात भागीदार म्हणून सामील करणे

क) तडजोड करणे अगर पैसे स्वीकारून भागीदारीची असलेली येणी सोडून देणे.

ड) कोणालाही जामीन राहणे अगर भागीदारीच्या मालमत्तेला किंवा मिळकतीला नुकसान पोहोचेल असे कोणतेही कृत्य जाणीवपूर्वक करणे.

ई) भागीदाराच्या सर्वसाधारण व्याव्हाराव्यातिरिक्त भागीदारीची कोणतीही मालमत्ता विकणे, गहाण टाकणे किंवा अन्य प्रकारे विल्हेवाट लावणे.

१३. यदा कदाचित भागीदारीत वितुष्ट आल्यास लवादाचा कायदा १९९६ नुसार व वेळोवेळी त्यातील बदलानुसार पंच नेमून जो निर्णय येईल तो आपण मंजूर करावयाचा आहे. व तो सर्व भागीदारांवर बंधनकारक राहील.

१४. भागीदारीच्या धंद्याकरिता कर्ज काढणे झाल्यास त्यास सर्व भागीदारांच्या संमती पाहिजे, तशी नसल्यास ज्या भागीदाराने कर्ज काढले असेल ते कर्ज त्यांचे वैयक्तिक समजले जाईल व त्याची जबाबदारी त्याचेवरच राहील,भागीदारीच्या धंद्यावर राहणार नाही.

१५. दुरुस्ती व बदल:-
भागीदारी पत्रातील सर्व नियम व शर्ती दुरुस्ती, बदल किंवा वाढ व कमी करण्याबाबतचे निर्णय १, २ यांच्या सहीने घेण्यात येतील

Nadhav KYKolewar

१६. कोणत्याही नवीन व्यक्तीस भागीदार करून घेणे किंवा काढून टाकण्याचे अधिकार सर्व भागीदारांना राहतील .

खालील साक्षीदारांच्या साक्षीने आज रोजी खाली स्वाक्षरी करत आहोत.

साक्षीदार :

१) सही –
नांव – श्रीलता खोमणे
पत्ता - नांदेड सिटी
पुणे

२) सही -
नांव – के. यश
पत्ता – नांदेड सिटी
पुणे

१) श्री नवनाथ दत्तात्रय जाधव

(भागीदार क्र.१)

२) करेवार वेंचर्स प्रायव्हेट लिमिटेड

(भागीदार क्र.२)